### आजचे पंचांग

दिनांक : २३ ऑगस्ट २०२६ वार : रविवार माह (अमावस्यांत) : श्रावण माह (पूर्णिमांत) : श्रावण ऋतु : शरद आयन : दक्षिणायन पक्ष : शुक्ल पक्ष तिथी : एकादशी तिथी (२४ ऑगस्ट पहाटे ०४:१८ पर्यंत) त्यानंतर द्वादशी तिथी नक्षत्र : मूळ नक्षत्र (सायंकाळी ०५:४४ पर्यंत) त्यानंतर पूर्वाषाढा नक्षत्र योग : विष्कुम्भ योग (सकाळी ०६:१३ पर्यंत) त्यानंतर प्रीति योग करण : वाणीजा करण (दुपारी ०३:१० पर्यंत) त्यानंतर विस्ती भद्रा करण



दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...


### अभिजीत दिपकेंचा पहिलाच दणका

**पिंपरी :** नीट पेपरफुटीच्या मुद्द्यावरून धर्मेंद्र प्रधानांच्या राजीनाम्यानंतर आता कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अध्यक्ष अभिजीत दिपकेंनी महाराष्ट्राचे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसेंकडे मोर्चा वळवल्याचं दिसत आहे.

महाराष्ट्रात त्यांनी शाळा सुधार आंदोलन सुरु केलंय. दिपकेंकडून राज्यातील विविध शाळांना भेटी दिल्या जात असून शाळांमधील गैरसोयी व त्रुटी निदर्शनास आणून दिल्या जात आहे. आंदोलनादरम्यान शाळेच्या दुरावस्था, शाळेतील इतर त्रुटी याबाबत शिक्षण विभागाला त्यांनी धारेवर धरलंय.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | रविवार, दि. २३ ऑगस्ट २०२६ | वर्ष - १ | अंक - ३२५ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


### सारांश वृत्त

## 'फडणवीसांना थोडीतरी लाजलज्जा असेल तर...', पृथ्वीराज चव्हाण संतापले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे : प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाजपच्या पुण्यातील अधिवेशनात विरोधकांना ठोकून काढा. आदेशाची वाट पाहू नका, असा सल्ला पदाधिकाऱ्यांना दिला . 'गृहमंत्र्यांच्या तोंडी ठोकाठोकीची भाषा शोभत नाही. त्यांना थोडीजरी लाजलज्जा असेल तर त्यांनी पदाचा राजीनामा द्यावा.' अशा शब्दांत माजी मुख्यमंत्री, काँग्रेसचे नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सुनावले.

आज (सोमारी) पृथ्वीराज चव्हाण यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी भाजप तसेच उपमुख्यमंत्री, गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीकेची झोड उठवली.

'भाजपच्या बैठकीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आदेशाची वाट पाहू नका विरोधकांना ठोकून काढा, असे नेत्यांना व पदाधिकाऱ्यांना सांगितले आहे. पैशाचा वापर, सत्तेचा दुरुपयोग आणि निवडणूक आयोगाचा दुरुपयोग ज्यांनी सत्तेसाठी केला. फडणवीस सारख्या गृहमंत्र्याच्या तोंडून ठोकाठोकीची भाषा शोभत नाही. याची निवडणूक आयोग दखल घेऊन कारवाई करणार का?' असा प्रश्न पृथ्वीराज चव्हाण यांनी उपस्थित केला आहे. भ्रष्टाचारातून त्यांनी महायुतीचे सरकार स्थापन केले आहे. तुरुंगात माणसं टाकून दहशत निर्माण केली जात आहेत. विधानसभेच्या निवडणुकीत त्यांना जनता धडा शिकवल्या शिवाय राहणार नाही, असेही चव्हाण म्हणाले.

नेमके काय म्हणाले होते फडणवीस

'विरोधकांना उत्तर देण्यासाठी आदेशाची वाट पाहू नका. मैदानात उतरा आणि ठोकून काढा.ज्याल बॅटींग करायची त्याने करावी पण अट एकच हिट विकेट होऊ नका. कारण समोरच्यावर बोलण्यापेक्षा आपल्यावर बोलला तर पुढीच चार दिवस त्याचे उत्तर देत बसावे लागेल.'असे फडणवीस रविवारी (ता.२१) पुण्यात झालेल्या भाजपच्या अधिवेशनात म्हणाले.

# 'महिलांनी कधीच स्वतंत्र राहू नये' हा मनुस्मृतीचा डाव; 'पिंजरा तोडा'चा राहुल गांधींचा एल्गार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे : प्रतिनिधी**

महिला ही देशाची सर्वात मोठी ताकद आहे. तिच्या स्वातंत्र्यावर कोणत्याही पुरुषाचा अधिकार असू शकत नाही. महिलांनी आपल्या आयुष्याचे निर्णय स्वतः घेण्याचा अधिकार आहे, * अशा शब्दांत काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांनी महिलांच्या स्वातंत्र्याचा मुद्दा आक्रमकपणे मांडला. पुण्यात आयोजित 'छात्रो की गुंज' कार्यक्रमात 'पिंजरा तोडा' या संकल्पनेतून त्यांनी महिला स्वातंत्र्य, शिक्षणातील समानता आणि तरुणांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर भाष्य केले.

हिलांनी कधीच स्वतंत्र राहू नये, हा मनुस्मृतीचा डाव असल्याची टीका राहुल गांधी यांनी केली. *तुम्ही स्वतःशिवाय कोणालाही बांधील नाही. महिलांवर कोणत्याही पुरुषाचा अधिकार नाही, * असे ते म्हणाले.

महिला आज शिक्षण, विज्ञान, उद्योग, प्रशासन, क्रीडा आणि राजकारण अशा विविध क्षेत्रांत स्वतःची क्षमता सिद्ध करीत आहेत. तरीही त्यांच्या निर्णयस्वातंत्र्यावर सामाजिक रूढी, परंपरा आणि पुरुषप्रधान मानसिकतेच्या माध्यमातून मर्यादा घालण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे राहुल गांधी यांनी सांगितले.

मुलींना शिक्षणाच्या समान संधी मिळणे ही केवळ सामाजिक गरज नसून देशाच्या विकासाची मूलभूत अट आहे. *मुलीने काय शिकावे, कुठे काम करावे, कोणते करिअर निवडावे आणि स्वतःचे भविष्य कसे घडवावे, हे ठरविण्याचा अधिकार तिचाच असला पाहिजे*, असे त्यांनी स्पष्ट केले.

'पिंजरा तोडा' ही संकल्पना केवळ महिलांपुरती मर्यादित नसून तरुणांच्या स्वातंत्र्याशीही संबंधित असल्याचे त्यांनी सांगितले. भारताची तरुण लोकसंख्या ही देशाची सर्वात मोठी ताकद आहे. मात्र, तरुणांना केवळ संधी देणे पुरेसे नाही; *त्यांना प्रश्न विचारण्याचे,




असहमती व्यक्त करण्याचे आणि स्वतःचे विचार मांडण्याचे स्वातंत्र्यही मिळाले पाहिजे*, असा मुद्दा त्यांनी मांडला.

विशेष म्हणजे, *मी येथे राजकारणावर बोलण्यासाठी आलेलो नाही, * असे स्पष्ट करत राहुल गांधी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यावर भर दिला. तरुणांच्या प्रश्नांना व्यासपीठ देणे आणि त्यांच्या विचारांना मोकळीक मिळणे हा कार्यक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

मात्र, महिलांच्या स्वातंत्र्याचा प्रश्न केवळ भाषणापुरता मर्यादित राहणार की प्रत्यक्ष सामाजिक आणि राजकीय कृतीतही त्याचे प्रतिबिंब दिसणार, हा प्रश्नही महत्त्वाचा आहे. आज महिला शिक्षण घेत आहेत, आर्थिकदृष्ट्या सक्षम होत आहेत, निर्णयप्रक्रियेत सहभागी होत आहेत; तरीही कुटुंबापासून कार्यक्षेत्रापर्यंत त्यांना अनेक अदृश्य बंधनांचा सामना करावा लागतो.

*महिलेला संरक्षणाच्या नावाखाली नियंत्रण नको, तर समानतेच्या आधारावर स्वातंत्र्य हवे. तरुणांना उपदेश नको, तर संधी आणि प्रश्न विचारण्याची मोकळीक हवी. पुण्यातील 'पिंजरा तोडा'चा संदेश त्यामुळे केवळ एका कार्यक्रमाची घोषणा न राहता समाजातील जुन्या मानसिकतेला थेट आव्हान देणारा ठरला. *महिलेची क्षमता पिंजऱ्यात बंदिस्त ठेवून देशाची ताकद वाढू शकत नाही; तिच्या स्वातंत्र्याला आकाश दिले तरच देशाची खरी प्रगती शक्य आहे*, असा सूर राहुल गांधी यांच्या भाषणातून उमटला.

## न्यायाधीश देव नाहीत, प्रत्येक निर्णय अचूक असेलच असे नाही! न्यायमूर्ती संजय करोलांचा निरोपाचा संदेश; 'याचिके पलीकडचा माणूस पाहा'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली : प्रतिनिधी**

न्यायाधीश देव नाहीत. प्रत्येक निर्णय योग्यच असेल असे नाही. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती संजय करोल यांनी आपल्या अखेरच्या कामकाजाच्या दिवशी केलेल्या या स्पष्ट वक्तव्याने न्यायव्यवस्थेतील मानवी मर्यादा आणि न्यायदानाच्या खऱ्या उद्देशावर गंभीर चर्चा सुरू केली आहे.

२२ ऑगस्ट २०२६ रोजी सर्वोच्च न्यायालयात त्यांच्या सन्मानार्थ आयोजित करण्यात आलेल्या औपचारिक खंडपीठाच्या कार्यक्रमात न्यायमूर्ती करोल यांनी न्यायाधीशांच्या भूमिकेबाबत महत्त्वाचे विचार मांडले. न्यायाधीशांनी स्वतःच्या निर्णयक्षमतेच्या मर्यादा ओळखल्या पाहिजेत आणि प्रत्येक प्रकरणाकडे केवळ कायदेशीर याचिका म्हणून नव्हे, तर त्या मागे असलेली व्यक्ती म्हणून पाहिले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

आपण न्यायाधीश म्हणून देव नाही. मी माझ्याबद्दल बोलत आहे. प्रत्येक निर्णय आपण अचूक देऊच असे नाही. मात्र आपल्या हातात एक गोष्ट नेहमी होतीयाचिकेकडे केवळ कागद म्हणून न पाहता, त्यामागचा माणूस पाहणे, असा आशय त्यांच्या वक्तव्यात होता.

न्यायमूर्ती करोल यांनी संविधानाच्या भूमिकेकडेही लक्ष वेधले. संविधान न्यायाधीशांना केवळ कायदा बरोबर लागू करण्याची जबाबदारी देत नाही, तर कायदा न्याय्य पद्धतीने लागू करण्याची अपेक्षा करते, असे त्यांनी स्पष्ट केले.

याच ठिकाणी त्यांच्या वक्तव्याचा सर्वात महत्त्वाचा मुद्दा आहे. न्यायालयीन निर्णय म्हणजे केवळ कोण कायदेशीरदृष्ट्या बरोबर आणि कोण चूक, याचा निकाल नाही. प्रत्येक याचिकेच्या मागे एखाद्या व्यक्तीचे आयुष्य, कुटुंब, स्वातंत्र्य, प्रतिष्ठा किंवा भवितव्य असू शकते. त्यामुळे कायद्याच्या शब्दांपलीकडे न्यायाची मानवी बाजू पाहणे आवश्यक आहे, असा संदेश त्यांनी दिला.

न्यायव्यवस्थेवर वाढत असलेल्या अपेक्षा, प्रलंबित खटले आणि न्यायालयीन निर्णयांवरील सार्वजनिक चर्चा यांच्या पार्श्वभूमीवर हे वक्तव्य विशेष महत्त्वाचे ठरते. कारण न्यायाधीशांकडून चूक होऊ शकते हे मान्य करणे ही न्यायव्यवस्थेची कमजोरी नसून स्वतःच्या अधिकारांवर मर्यादा स्वीकारण्याची ताकद आहे.

न्यायमूर्ती संजय करोल यांचा निरोपाचा संदेश त्यामुळे केवळ एका न्यायाधीशाचा भावनिक शेवट नाही; तो न्यायव्यवस्थेला दिलेला आरसा आहे कायद्याचा निर्णय देताना समोरचा माणूस दिसतोय का?

## मुंबईत उद्धवसेनेला मोठा धक्का! विशाखा राऊत यांचे नगरसेवकपद रद्द

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे : प्रतिनिधी**

मुंबई - उद्धव ठाकरेंच्या पक्षाला मुंबई महापालिकेत मोठा धक्का बसला आहे. माजी महापौर नगरसेविका विशाखा राऊत यांच्या नगरसेवक पदावर टांगती तलवार आहे. पालघर जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने विशाखा राऊत यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरवले आहे. त्यामुळे विशाखा राऊत यांचे नगरसेवक पद धोक्यात आले आहे.

माहितीनुसार, विशाखा राऊत या उद्धवसेनेच्या दादर प्रभागातील नगरसेविका आहेत. त्यांनी निवडणुकीपूर्वी दाखल केलेले जात प्रमाणपत्र पालघर जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने अवैध ठरवले आहे. आता हा विषय सभागृहात मांडल्यावर त्यावर चर्चा होईल. मात्र जात प्रमाणपत्र योग्य असल्याचं सिद्ध करण्यासाठी विशाखा राऊत यांच्याकडे ३ महिन्याचा कालावधी आहे. या कालावधीत विशाखा राऊत कोर्टाकडे अपील करू शकतात. मात्र त्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरल्याने त्यांना मोठा राजकीय धक्का मानला जातो. विशाखा राऊत यांच्याविरोधात माजी आमदार सदा सरवणकर यांची मुलगी प्रिया सरवणकर यांनी निवडणूक लढवली होती. यावर विशाखा राऊत म्हणाल्या की, न्यायिक क्षेत्राच्या तांत्रिक कारणावरून माझे जात प्रमाणपत्र अवैध ठरवले आहे. नवीन तरतुदीप्रमाणे मला या निर्णयाला अपील करण्यासाठी ३ महिन्याचा अवधी आहे. माझे



नगरसेवकपद रद्द झाले नाही. माझ्याकडे ३ महिने आहेत. त्यामुळे मी यावर अपील करणार आहे. माझ्याकडे १९११ पासूनची माझ्या पंजोबांचे कागदपत्रे आहेत. ते सगळे वैध कागदपत्रे आहेत, ज्याने माझी जात कुणबी आहे हे सिद्ध करते. मात्र शिंदेसेनेच्या दबावामुळे माझे जात प्रमाणपत्र अवैध ठरवण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे. दरम्यान, पालघर जिल्हा जात प्रमाणपत्र समितीकडे मला जात प्रमाणपत्र देण्याचे न्यायिक अधिकार नाहीत. माझ्याकडे जातीचे प्रमाणपत्र नाही. मी त्यासाठी अर्ज दाखल केला होता. निवडणुकीआधी हे प्रमाणपत्र मला देण्यात आले. ते प्रमाणपत्र छाननी समितीकडे गेले आणि तिथे शिंदेसेनेच्या लोकांनी दबाव टाकून माझे प्रमाणपत्र अवैध ठरवले. परंतु ३ महिन्याच्या कालावधीत माझे जात प्रमाणपत्र वैध ठरेल हा माझा विश्वास आहे. माझ्याकडे वेळ आहे त्यामुळे अपीलाबाबत मी ठरवेन असंही विशाखा राऊत यांनी सांगितले.

## 'युक्तिवाद म्हणजे निर्णय नव्हे'नार्वेकरांचा दावा; मग न्यायालयीन प्रक्रियेचा अंतिम शब्द कुणाचा?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवसेना पक्ष आणि 'धनुष्यबाण' चिन्हाच्या वादावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू असताना विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केलेले 'युक्तिवाद म्हणजे न्यायालयाचा निर्णय नव्हे' हे विधान वरकरणी कायदेशीर प्रक्रियेची आठवण करून देणारे असले, तरी त्यातून न्यायव्यवस्थेवरील विश्वास, घटनात्मक संस्थांची प्रतिष्ठा आणि निर्णय प्रक्रियेबाबत गंभीर प्रश्न निर्माण होतात.

ठाकरे गटाने निवडणूक आयोग आणि विधानसभा अध्यक्षांच्या निर्णयांवर गंभीर आक्षेप घेत सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली आहे. न्यायालयात एका बाजूचा युक्तिवाद झाला आहे आणि पुढे दुसऱ्या बाजूचे म्हणणेही ऐकले जाणार आहे. त्यामुळे अंतिम निर्णय येण्यापूर्वी कोणत्याही बाजूने स्वतःच्या भूमिकेला अंतिम सत्य मानणे घटनात्मकदृष्ट्या योग्य ठरणार नाही. याच कारणामुळे नार्वेकरांचे विधानही अधिक गांभीर्याने पाहण्याची गरज आहे.

न्यायालयात युक्तिवाद सुरू असताना सार्वजनिक व्यासपीठावरून संबंधित निर्णय 'शाश्वत' असल्याचा आत्मविश्वास व्यक्त करणे कितपत योग्य? हा प्रश्न केवळ राजकीय नाही; तो न्यायिक प्रक्रियेच्या प्रतिष्ठेशी संबंधित आहे.

नार्वेकर यांनी आपला निर्णय कायद्याच्या चौकटीत आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निकषांनुसार दिल्याचे स्पष्ट केले. हा त्यांचा घटनात्मक अधिकार आहे. मात्र, त्याच निर्णयाची वैधता आणि घटनात्मकता आता सर्वोच्च न्यायालयाच्या परीक्षणाखाली आहे. अशा परिस्थितीत अंतिम निकालापूर्वी स्वतःच्या निर्णयाचे समर्थन करताना वापरली जाणारी भाषा ही संयत आणि संस्थात्मक असणे अपेक्षित आहे.

लोकशाहीमध्ये न्यायालय हे केवळ वाद मिटविण्याचे ठिकाण नाही; ते संविधानाच्या मर्यादा तपासणारे अंतिम घटनात्मक व्यासपीठ आहे. त्यामुळे न्यायालयीन प्रक्रियेत कोणत्याही संस्थेच्या निर्णयाला अंतिम वैधता न्यायालयाच्या परीक्षणानंतरच प्राप्त होते. युक्तिवाद कोणत्याही बाजूने केला जाऊ शकतो; परंतु त्या युक्तिवादाचे मूल्यांकन कोण करणार, याचा अंतिम अधिकार न्यायालयाचाच आहे.

शिवसेना आमदार अपात्रता प्रकरण आणि पक्ष-चिन्हाचा वाद हा केवळ दोन राजकीय गटांमधील संघर्ष राहिलेला नाही. या प्रकरणातून विधानसभा अध्यक्षांची भूमिका, निवडणूक आयोगाचे अधिकार, पक्षातील बहुमताची व्याख्या आणि आमदारांच्या अपात्रतेसंबंधी घटनात्मक तरतुदी यांची कसोटी लागली आहे.

म्हणूनच या प्रकरणात कोणत्याही घटनात्मक पदावरील व्यक्तीने 'माझा निर्णय योग्यच आहे' या भूमिकेपेक्षा 'न्यायालय जो अंतिम निर्णय देईल, तो स्वीकारला जाईल' हा संदेश अधिक ठामपणे देणे लोकशाहीच्या दृष्टीने आवश्यक आहे.

न्यायालयावर टीका करण्याचा किंवा न्यायालयीन युक्तिवादावर भाष्य करण्याचा अधिकार लोकशाहीत आहे. परंतु न्यायालयीन प्रक्रियेची प्रतिष्ठा टिकविणे ही प्रत्येक घटनात्मक संस्थेची जबाबदारी आहे. न्यायालयाच्या निकालापूर्वी स्वतःच्या निर्णयाला नैतिक किंवा कायदेशीर अंतिमता देण्याचा आभास निर्माण झाला, तर सर्वसामान्यांच्या न्यायव्यवस्थेवरील विश्वासालाच धक्का बसू शकतो.

आज देशात न्यायव्यवस्थेबद्दल सामान्य नागरिकांच्या मनात असलेला विश्वास ही लोकशाहीची मोठी ताकद आहे. हा विश्वास टिकविण्यासाठी राजकीय पक्षांपासून घटनात्मक पदाधिकाऱ्यांपर्यंत प्रत्येकाने संयम पाळणे गरजेचे आहे.

नार्वेकरांनी 'युक्तिवाद म्हणजे न्यायालयाचा निर्णय नव्हे' असे म्हटले, हे तत्त्वतः बरोबर आहे. पण याच तत्त्वाचा पुढचा भागही तितकाच महत्त्वाचा आहे'घटनात्मक पदाधिकाऱ्याचा निर्णयही न्यायालयीन परीक्षणापलीकडे नाही.'

म्हणूनच आता प्रश्न कोणाचा युक्तिवाद अधिक प्रभावी आहे, हा नसून संविधानाच्या कसोटीवर कोणती भूमिका टिकते, हा आहे. अंतिम शब्द न्यायालयाचाच असला पाहिजे आणि त्या अंतिम शब्दाचा सन्मान करण्याची जबाबदारी सर्वांचीच आहे.

कारण लोकशाहीत व्यक्तीपेक्षा संस्था मोठी आणि संस्थेपेक्षा संविधान सर्वोच्च असते.

## सिंहस्थासाठी ३५ हजार कोटी; मग शिक्षणाचे काय? कंत्राटदारांची देणी कधी फेडणार?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नाशिक : प्रतिनिधी**

सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी तब्बल ३५ हजार कोटी रुपयांच्या विकासकामांचा डंका वाजवला जात असताना या भव्य विकासाच्या सावलीत काही अस्वस्थ करणारे प्रश्न मात्र अनुत्तरितच आहेत. १२ कोटी भाविकांच्या स्वागतासाठी हजारो कोटींचा खर्च होणार; पण शिक्षणासाठी पुरेसा निधी, शिक्षकांच्या समस्या आणि विकासकामे करणाऱ्या कंत्राटदारांची थकीत देणी यांचे काय? सिंहस्थासाठी ८५ टक्के कामे कायमस्वरूपी असल्याचा दावा स्वागतार्ह असला, तरी त्या कायमस्वरूपी सुविधांमध्ये शाळा, महाविद्यालये आणि शैक्षणिक पायाभूत सुविधांना किती प्राधान्य मिळाले, हा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे.

नाशिक-त्र्यंबकेश्वर परिसरात रस्ते, पूल, वाहतूक, पाणी, आरोग्य आणि अन्य पायाभूत सुविधांसाठी मोठ्या प्रमाणावर निधी खर्च केला जात आहे. मात्र, विकासाची खरी व्याख्या केवळ काँक्रीटच्या रस्त्यांपुरती मर्यादित असू शकत नाही. ज्या जिल्ह्यातील पुढील पिढी घडणार आहे, त्या जिल्ह्यात शिक्षणाच्या पायाभूत सुविधांकडे दुर्लक्ष करून विकासाचा दावा कितपत सार्थ ठरतो?

सिंहस्थासाठी १२ कोटी भाविक येणार असतील तर त्यांच्यासाठी सुविधा निर्माण करणे आवश्यकच आहे. धार्मिक पर्यटनामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळणार, रोजगाराच्या संधी वाढणार आणि नाशिक-त्र्यंबकेश्वरची ओळख जागतिक स्तरावर होणार, हेही महत्त्वाचे आहे. पण त्याचवेळी सरकारी शाळांची अवस्था, विद्यार्थ्यांसाठी आधुनिक प्रयोगशाळा, डिजिटल शिक्षण, ग्रंथालये, वसतिगृहे, शिक्षकांची उपलब्धता आणि ग्रामीण भागातील शैक्षणिक सुविधा यांचाही विकासाच्या आराखड्यात ठोस समावेश असायला हवा.

दुसरा गंभीर मुद्दा म्हणजे कंत्राटदारांची देणी. हजारो कोटींची कामे सुरू असताना त्यांची बिले वेळेवर अदा होत आहेत का? काम पूर्ण करूनही देयके रखडली असतील, तर त्याचा परिणाम कामाच्या गतीवरच नव्हे तर छोट्या-मोठ्या कंत्राटदारांच्या आर्थिक अस्तित्वावर होतो. मोठ्या प्रकल्पांची घोषणा करणे सोपे; पण काम करणाऱ्या कंत्राटदाराला त्याचा पैसा वेळेवर देणे हीदेखील सरकारची जबाबदारी आहे.

कंत्राटदारांना देणी थकीत ठेवून एका बाजूला नवीन कामांना मंजुरी आणि दुसऱ्या बाजूला हजारो कोटींच्या खर्चाची घोषणा, हा आर्थिक नियोजनाचा विरोधाभास ठरू शकतो. विशेषतः स्थानिक आणि लघु कंत्राटदारांना वेळेवर पैसे मिळाले नाहीत, तर त्यांच्या कर्मचाऱ्यांचे वेतन, उपकंत्राटदारांची देणी आणि साहित्य पुरवठादारांचे पैसे अडकतात. त्यामुळे सिंहस्थाच्या निधीचा केवळ 'किती खर्च होणार?' एवढाच प्रश्न नको; 'किती पैसा प्रत्यक्ष खर्च झाला, किती बिले प्रलंबित आहेत आणि कोणाची किती देणी बाकी आहेत?' याचाही सार्वजनिक हिशेब हवा.

सध्या सुरू असलेल्या खोदकामांमुळे नागरिक त्रस्त आहेत, रस्त्यांची अवस्था बिकट झाली आहे, वाहतुकीचे प्रश्न निर्माण झाले आहेत. प्रशासनाने नागरिकांचा त्रास मान्य केला आहे. मात्र, नागरिकांनी आज सहन केलेला त्रास उद्याच्या चांगल्या सुविधांमध्ये रूपांतरित होणार असेल, तर त्या कामांमध्ये पारदर्शकता, दर्जा आणि वेळेचे बंधनही तितकेच महत्त्वाचे आहे.

सिंहस्थ हा नाशिकच्या विकासासाठी मोठी संधी आहे; मात्र ही संधी केवळ धार्मिक पर्यटनापुरती मर्यादित राहता कामा नये. नाशिकला आध्यात्मिक राजधानी बनवताना शैक्षणिक राजधानी होण्याची क्षमता का दुर्लक्षित करायची? पायाभूत सुविधांसोबत ज्ञानाची पायाभूत रचना उभी करणे हीच खऱ्या अर्थाने पुढील पिढीची गुंतवणूक ठरेल.

सिंहस्थासाठी ३५ हजार कोटी खर्च होत असतील, तर सरकारने त्याचा स्पष्ट आणि पारदर्शक हिशेब जनतेसमोर ठेवावा. त्यासोबत शिक्षणासाठी किती निधी, कंत्राटदारांची किती थकबाकी आणि ती कधीपर्यंत अदा होणार, याचेही वेळापत्रक जाहीर करावे.

भाविकांचे स्वागत करा; पण विद्यार्थ्यांचे भविष्य आणि कष्टाने काम करणाऱ्या कंत्राटदारांचे हक्क यांच्या किंमतीवर नव्हे. सिंहस्थाचा उत्सव भव्य असावा, पण त्याहून भव्य असावी ती जनतेच्या पैशांची पारदर्शकता!

## संपादकीय

### सीओईपीमध्ये राजकीय आखाडा नको; विद्येच्या मंदिरात विद्यार्थ्यांच्या हातात पुस्तकेच हवीत

विद्या, उद्यम, कला, संस्कृती इथे ना काही उणे, उभ्या भारत भूषण वाटे असे आमचे पुणे!

अशी ओळख असलेल्या पुण्याच्या शैक्षणिक संस्कृतीला धक्का देणारी घटना शुक्रवारी रात्री त्रीओईपी टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटीच्या वसतिगृह परिसरात घडली.राहुल गांधी यांच्या 'छात्रों की गूंज'कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर एबीव्हीपी आणिछ्डणखशीसंबंधितगटांमध्येवादझालाआणि त्याचे रूपांतर हाणामारीत झाले. पोलिसांना हस्तक्षेप करून काही जणांना ताब्यात घ्यावे लागले.

या घटनेकडे केवळ 'दोन विद्यार्थी संघटनांमधील भांडण' म्हणून पाहणे धोकादायक ठरेल. कारण प्रश्न त्रीओईपीचा आहे, पुण्याच्या शैक्षणिक प्रतिष्ठेचा आहे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा आहे.

या प्रकरणात दोन्ही बाजूंनी परस्परविरोधी आरोप केले आहेत. एनएसयुआय-काँग्रेसकडून काही विद्यार्थिनींना धमकावल्याचा, कार्यक्रमाला जाण्यापासून रोखल्याचा आरोप क रण्यात आला आहे. दुसरीकडे एबीव्हीपीकडून काँग्रेस-एनएसयुआय कार्यकर्त्यांनी विद्यार्थ्यांवरकार्यक्रमासाठीदबाव आणल्याचा आरोपकरण्यात आला आहे. त्यामुळे आरोपआणि प्रत्यारोपां पलीकडे जाऊन पोलिसांनी आणि विद्यापीठ प्रशासनाने वस्तुनिष्ठ चौकशी करणे गरजेचे आहे.

याहून गंभीर बाब म्हणजे यावादातून एका विद्यार्थ्याच्या कथित मारहाणीप्रकरणी शिवाजीनगर पोलिसांनी सहा नामनिर्देशित व्यक्तींसहसुमारे ५० ते ६० जणांविरोधात गुन्हा दाखल केल्याचे वृत्त आहे. पोलिसांनी सीसीटीव्ही आणि इलेक्ट्रॉनिक पुराव्यांची तपासणी सुरू केली आहे. त्यामुळे सोशल मीडियावरील व्हायरल व्हिडिओ किंवा कोणत्याही एका संघटनेच्या दाव्यावर अंतिम निष्कर्ष काढण्याऐवजी कायदा आपले काम करू देणे आवश्यक आहे.

पण याघटनेचा सर्वांत मोठा धडा वेगळाच आहे. विद्यार्थ्याने प्रश्न विचारणे हा गुन्हा नाही. व्यवस्थेविरोधात आवाज उठवणे हा गुन्हा नाही.एखाद्या राजकीय कार्यक्रमाला जाणे किंवा न जाणे हा प्रत्येक विद्यार्थ्याचा वैयक्तिक निर्णय आहे. कोणत्याही विद्यार्थ्याला धमकावणे, दबाव आणणे, मारहाण करणे किंवा त्याच्या स्वातंत्र्यावर गदा आणणे हे कोणत्याही विचारसरणीला शोभणारे नाही.

विद्यापीठ म्हणजे विचारांची प्रयोगशाळा असते. तिथे मतभेद असणारच. एबीव्हीपी असो, एनएसयुआय असो किंवा कोणतीही अन्यविद्यार्थीसंघटना असो विचार मांडण्याचा अधिकार सर्वांना आहे. परंतु विचारांचा पराभव करण्यासाठी हात उचलण्याची वेळ आली, तरत्या क्षणी शिक्षणाचा पराभव होतो.

राहुल गांधींचा पुणे दौरा हा राजकीय कार्यक्रम असू शकतो. त्याला विरोध करण्याचाही लोकशाही मार्ग उपलब्ध आहे. पोलिसांनी या कार्यक्रमासाठी परवानगी देताना अनेक अटी घातल्या होत्या आणि विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर केंद्रित कार्यक्रमासाठी मोठी गर्दी अपेक्षित होती. मात्र कोणत्याही राजकीय नेत्याच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने महाविद्यालयीन परिसरात दहशतीचे किंवा शक्तप्रदर्शनाचे वातावरण निर्माण होणे योग्य नाही .

सीओईपी ही केवळ एक संस्था नाही; ती महाराष्ट्राच्या अभियांत्रिकी शिक्षणाच्या गौरवशाली परंपरेचा भाग आहे. अशा संस्थेच्या वसतिगृहात विद्यार्थी राजकीय संघर्षात भिडत असतील, तर त्यामागील कारणांवर ही गंभीर आत्मपरीक्षण झाले पाहिजे. विद्यार्थी संघटनांना राजकीय पक्षांचे विस्तार केंद्र बनवायचे आहे की विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी संघर्ष करणारे व्यासपीठ, हा प्रश्न आता स्पष्टपणे विचारण्याची वेळ आली आहे.

महिला विद्यार्थिनींच्या सुरक्षेचा प्रश्न तर कोणत्याही राजकारणापेक्षा मोठा आहे. विद्यार्थिनीने शिष्यवृत्ती, शिक्षण, सुरक्षा किंवा प्रशासनाशी संबंधित प्रश्न उपस्थित केला असेल, तर तिचे म्हणणे ऐकून घेणे ही संस्थेची जबाबदारी आहे. तिच्यावर दबाव आणला गेला का, तिला धमकावले गेले का, तिला कुठे रोखून ठेवले गेले का या आरोपांची सत्यता तपासणे आवश्यक आहे. आरोप खरे असतील तर कठोरकारवाई झाली पाहिजे; खोटे असतील तर ते ही स्पष्ट झाले पाहिजे.

पोलिसांनी या संपूर्ण प्रकरणात कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता निष्पक्ष तपास करावा. विद्यापीठ प्रशासनाने स्वतंत्र चौकशी करून दोषी विद्यार्थ्यांवर संस्थात्मक कारवाई करावी. तसेच भविष्यात राजकीय कार्यक्रमांच्या पार्श्वभूमीवर वसतिगृह आणि कॅम्पसमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी स्पष्ट नियम आखले पाहिजेत. सीओईपी हा राजकीय आखाडा नाही. तो विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना आकार देणारे विद्येचे मंदिर आहे.

पुण्याच्या सांस्कृतिक आणि शैक्षणिक परंपरेला शोभणारे दृश्य असे असावे विद्यार्थ्यांच्या हातात पुस्तके, डोक्यात प्रश्न, ओठांवर तर्क आणि मनात लोकशाही. हातात दगड, लाथा-बुक्क्या आणि धमक्या नव्हेत.

राजकीय पक्षांनी विद्यार्थ्यांना आपल्या शक्तिप्रदर्शनाचे साधन बनवू नये. विद्यार्थी संघटनांनी ही आपली ताकद हाणामारीत नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या प्रश्नांच्या लढ्यात दाखवावी.

कारण विद्यार्थ्यांचे भविष्य जाळून कोणत्याही विचारसरणीचा विजय होत नाही. उलट, त्याआगीत पुण्याच्या विद्येच्या परंपरेची राख होते

# थेरगावकरांचा डीपी रोड, रिंग रोडला ठाम विरोध; सुनावणीवेळी नागरिकांनी मांडली भूमिका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**थेरगाव । प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील थेरगाव परिसरात नव्याने प्रस्तावित करण्यात आलेल्या प्रारूप विकास आराखड्यातील (डीपी) रोड आणि रिंग रोडला विरोध करणाऱ्या हरकतींवर शुक्रवारी (दि. २१) ग. दि. माडगूळकर सभागृहात सुनावणी पार पडली. थेरगाव बहुउद्देशीय रहिवासी संघाच्या आवाहनाला प्रतिसाद देत नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. नागरिकांनी आपल्या घरांना व मालमत्तेला बाधा आणणाऱ्या प्रस्तावित रस्त्यांना तीव्र विरोध दर्शवत प्रशासनासमोर आपली भूमिका ठामपणे मांडली.

अशोका सोसायटी येथील पिंपळाच्या झाडाजवळ थेरगावकर एकत्र जमले. त्यानंतर एकत्रितपणे ग. दि. माडगूळकर सभागृहाकडे जात नागरिकांनी सुनावणी प्रक्रियेत सहभाग घेतला. यावेळी थेरगाव बहुउद्देशीय रहिवासी संघाच्या वतीने नियोजन समितीला लेखी निवेदन देण्यात आले.

संघाचे अध्यक्ष अक्षय कांबळे यांनी थेरगावकरांची भूमिका स्पष्ट करताना, थेरगावला कोणत्याही नव्या डीपी रोड किंवा रिंग रोडची आवश्यकता नाही. परिसरात सध्या सिमेंट-काँक्रीट आणि डांबरी रस्त्यांचे जाळे उपलब्ध आहे. त्यामुळे नागरिकांच्या घरांना बाधा आणणाऱ्या नव्या रस्त्यांची गरज नाही, अशी ठाम भूमिका मांडली.



यावेळी यापूर्वी झालेल्या बैठकीत आमदारांनी दिलेल्या कोणाच्याही घराला धक्का लागणार नाही या आश्वासनाचीही प्रशासनाला आठवण करून देण्यात आली. विकासकामांच्या नावाखाली थेरगावातील कोणत्याही नागरिकाच्या घराला किंवा मालमत्तेला बाधा पोहोचू नये, अशी मागणी करण्यात आली.

थेरगाव हा वाकडनंतर मोठ्या प्रमाणात कर व शास्ती कर भरणारा परिसर असून, येथील नागरिकांच्या मालमत्तेचे संरक्षण करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे, असा मुद्दाही रहिवासी संघाने मांडला.

प्रॉपर्टी कार्डचा प्रश्न ऐरणीवर

सुनावणीदरम्यान थेरगावातील अनेक वर्षांपासून अस्तित्वात असलेल्या घरांच्या प्रॉपर्टी कार्डचा प्रश्न नागरिकांनी उपस्थित केला. मालकी हक्क आणि वास्तव्याशी संबंधित कागदपत्रे तसेच नागरिकांचे म्हणणे लेखी स्वरूपात नियोजन समितीसमोर सादर करण्यात आले. प्रस्तावित रस्त्यांमुळे बाधित होणाऱ्या कुटुंबांच्या मालमत्ता हक्कांचा योग्य विचार करून निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली.

हरकतींवरील सुनावणीवेळी पिंपरी-चिंचवड स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे यांच्यासह प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. थेरगाव बहुउद्देशीय रहिवासी संघाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नागरिकांनी आपल्या हरकती, प्रश्न आणि मागण्या स्पष्टपणे मांडत प्रस्तावित रस्त्यांना विरोध दर्शविला. नागरिकांच्या मालमत्ता हक्कांसोबतच परिसराची सध्याची वाहतूक व विकासाची गरज यांचा समतोल साधून प्रशासनाने निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली. प्रस्तावित डीपी रोड आणि रिंग रोडबाबत प्रशासन नागरिकांच्या भूमिकेचा गांभीर्याने विचार करेल, असा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला.

# अत्याधुनिक तंत्रज्ञानातून 'चांगल्या डिजिटल जगाची' निर्मिती करा : डॉ. निलेश देसाई

## पीसीसीओई येथे आयईईई आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन; २,२६३ संशोधन प्रबंध प्राप्त, २३८ प्रबंधांचे सादरीकरण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

पिंपरी, पुणे, दि. २२ ऑगस्ट २०२६ : उपग्रह तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग आणि क्वांटम तंत्रज्ञान ही भविष्यातील डिजिटल जगाची महत्त्वाची क्षेत्रे आहेत. या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग मानवकल्याणासाठी करून 'चांगल्या डिजिटल जगाची' निर्मिती करणे गरजेचे आहे. भारताने या क्षेत्रांमध्ये आत्मनिर्भरतेच्या दिशेने वेगाने वाटचाल करावी, असे प्रतिपादन स्पेस ॲप्लिकेशन्स सेंटर, अहमदाबादचे माजी संचालक डॉ. निलेश देसाई यांनी केले.

पिंपरी-चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या आकुर्डी येथील पिंपरी-चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (पीसीसीओई) येथे 'टेक्नॉलॉजी फॉर गुड : बिल्डिंग अ बेटर डिजिटल वर्ल्ड' या विषयावर आधारित दोन दिवसीय दहाव्या आयईईई संगणक, संचार, नियंत्रण आणि स्वचालन परिषद (खउउउणइए २०२६) चे उद्घाटन झाले. आयईईई सिग्नल प्रोसेसिंग सोसायटी पुणे चॅप्टरच्या सहकार्याने आयोजित या परिषदेत डॉ. देसाई बोलत होते. यावेळी खउउउणइए २०२६च्या स्मरणिकेचे अनावरण करण्यात आले.

डॉ. देसाई म्हणाले की, स्वदेशी तंत्रज्ञानाच्या विकासामुळे दळणवळण, नेव्हिगेशन आणि संरक्षण क्षेत्राला मोठी ताकद मिळत आहे. भविष्यात स्मार्टफोनपासून उपग्रह संप्रेषणापर्यंत तंत्रज्ञान अधिक सक्षम आणि सर्वव्यापी होणार आहे. या तंत्रज्ञानात्मक परिवर्तनात भारतातील तरुण संशोधकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असेल.

यावेळी बिर्ला इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड सायन्स (इखढ्ठ) पिलानी समूहाचे कुलगुरू डॉ. व्ही. रामगोपाल राव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता (प्रभारी) डॉ. रावसाहेब लटपटे, आयईईई पुणे सेक्शनचे प्रतिनिधी डॉ. मंदार भवाळकर, पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी, पीसीईटी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलचे अधिष्ठाता डॉ. शितलकुमार रवंदळे, खउउउणइए २०२६च्या जनरल चेअर डॉ. सोनाली पाटील, व्हाइस जनरल चेअर डॉ. वर्षा के. हरपळे यांच्यासह प्राध्यापक, विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते.

डॉ. रामगोपाल राव म्हणाले की, खउउउणइएच्या दहाव्या आवृत्तीपर्यंतचा प्रवास हा पीसीसीओईच्या संशोधन, नवोन्मेष आणि शैक्षणिक गुणवत्तेची महत्त्वपूर्ण नोंद आहे. तंत्रज्ञानातील प्रगतीसोबतच त्याचा उपयोग समाजाच्या हितासाठी होणे आवश्यक आहे. संशोधक, विद्यार्थी, शैक्षणिक संस्था आणि उद्योग यांच्यातील सहकार्यामुळे संशोधनाला व्यावहारिक स्वरूप प्राप्त होते.

डॉ. रावसाहेब लटपटे यांनी तंत्रज्ञानाचा केंद्रबिंदू मानव आणि समाजहित असला पाहिजे, असे सांगितले. कृत्रिम बुद्धिमत्ता, ऑटोमेशन, कम्युनिकेशन आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा विकास जबाबदार, सुरक्षित, सर्वसमावेशक आणि शाश्वत पद्धतीने होणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

डॉ. मंदार भवाळकर यांनी यंदा परिषदेसाठी भारतासह परदेशातून २, २६३ संशोधन प्रबंध प्राप्त झाल्याचे सांगितले. कठोर समीक्षा प्रक्रियेनंतर त्यापैकी २३८ संशोधन प्रबंधांचे परिषदेत सादरीकरण करण्यात येत असल्याने परिषदेची गुणवत्ता आणि जागतिक स्वीकारार्हता अधोरेखित होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

परिषदेत अत्याधुनिक तंत्रज्ञान, संगणकशास्त्र, कम्युनिकेशन, कंट्रोल, ऑटोमेशन, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि भविष्यातील डिजिटल तंत्रज्ञानातील संशोधन व नवकल्पनांवर विविध सत्रांमध्ये चर्चा करण्यात येत आहे. संशोधनातील नव्या दिशा आणि तंत्रज्ञानाच्या व्यावहारिक उपयोगावरही या परिषदेत विचारमंथन होत आहे.

खउउउणइए २०२६च्या जनरल चेअर डॉ. सोनाली पाटील यांनी परिषदेची भूमिका व उद्दिष्टे स्पष्ट केली. स्वागत पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. सोनल शिर्के यांनी केले, तर आभार डॉ. वर्षा हरपळे यांनी मानले.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर आणि कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

# दापोडी पोलीस ठाणे : निष्काळजीपणामुळे कामगाराचा मृत्यू

## सुरक्षा साधनांअभावी शेडवरून पडून कामगाराचा मृत्यू; कासारवाडीतील घटनेप्रकरणी दोघांवर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

उंचावर काम करण्यासाठी कोणतीही सुरक्षा साधने उपलब्ध करून न दिल्याने पहिल्या मजल्यावरून पडून तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना कासारवाडी येथील 'ह' प्रभाग क्षेत्रीय कार्यालयात घडली आहे. याप्रकरणी निष्काळजीपणाचा ठपका ठेवत दापोडी पोलिसांनी दोघांना नोटीस बजावली आहे.

काय आहे घटना?

फिर्यादी विठ्ठल महादु साबळे (वय ६५ वर्ष, रा. काळेवाडी) यांचा मुलगा राहुल साबळे हा पार्वती इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅण्ड इलेक्ट्रिकल तसेच ए लाईट अ‍ॅण्ड डेकोरेशन या दुकानात कामाला होता. १८ ऑगस्ट रोजी दुपारी ४ च्या सुमारास कासारवाडी येथील 'ह' प्रभाग कार्यालयाच्या पहिल्या मजल्यावरील पत्र्याच्या शेडवरील लायटिंग काढण्याचे काम राहुल करत होता. मात्र, फर्मच्या मालकांनी त्याला सेफ्टी बेल्ट, शूज, हेल्मेट अथवा कोणतीही सुरक्षित शिडी दिली नव्हती. लायटिंग काढल्यानंतर खाली उतरत असताना तोल गेल्याने राहुल उंचावरून खाली पडला आणि डोक्याला व पायाला गंभीर मार लागल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला.

याप्रकरणी निष्काळजीपणामुळे मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी आरोपी राम इंगळे आणि अब्दुल गुलाब बेग (रा. काळेवाडी) यांच्यावर इछ्ड कलम १०६ (भा.दं.वि. कलम ३०४ अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस पुढील तपास करत आहेत. १: दिघी पोलीस ठाणे (हॉटेलवर हुक्का पार्लर छापा)

**मॅगझिन रोडवरील 'हॉटेल ट्री टाऊन'मध्ये बेकायदेशीर हुक्का पार्लरवर पोलिसांचा छापा; चौघांवर गुन्हा दाखल**

पिंपरी-चिंचवड:

दिघी-मॅगझिन रस्त्यावरील 'हॉटेल ट्री टाऊन'मध्ये ग्राहकांना जेवणासोबत बेकायदेशीरपणे हुक्का पुरवणाऱ्या अड्ड्यावर दिघी पोलिसांनी छापा टाकला आहे. याप्रकरणी पोलिसांनी चार जणांविरुद्ध सिगारेट व तंबाखू उत्पादने प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे.

कारवाईचा तपशील:

दिघी पोलीस ठाण्याचे पोलीस शिपाई सोमनाथ बाळू खळसोडे यांच्या तक्रारीनुसार, २० ऑगस्ट रोजी रात्री ११:३० च्या सुमारास हॉटेल ट्री टाऊनमध्ये तपासणी करण्यात आली. त्यावेळी हॉटेलमध्ये स्वतंत्र स्मोकिंग झोन नसतानाही डायनिंग टेबलवरच ग्राहकांना हर्बल हुक्का व टोबॅको हुक्का पुरवला जात असल्याचे निष्पन्न झाले. पेटता कोळसा घेऊन वेटर ग्राहकांच्या टेबलजवळून जात असल्याने आगीचा धोका निर्माण झाला होता.

गुन्हा दाखल करण्यात आलेले आरोपी:

अक्षय तापकीर (वय २१ वर्ष, रा. वडमुखवाडी, चऱ्होली)

समशेर मनसूर अहमद (वय २९ वर्ष, रा. ट्री टाऊन हॉटेल, मूळ रा. जौनपूर, उत्तर प्रदेश)

किशन कुमार श्रवण साहनी (वय २० वर्ष, रा. ट्री टाऊन हॉटेल, मूळ रा. मधुबनी, बिहार)

अरबाज इम्रान अहमद (वय २० वर्ष, रा. ट्री टाऊन हॉटेल, मूळ रा. आझमगढ, उत्तर प्रदेश)

या चौघांविरुद्ध इछ्ड कलम २८७, १२५, २२३, ३(५) तसेच उजढझ्अ कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस उपनिरीक्षक वारे पुढील तपास करत आहेत. एमआयडीसी भोसरी पोलीस ठाणे (हिट अ‍ॅण्ड रन)

**मोशीत भरधाव अज्ञात ट्रॅक्टरची दुचाकीला धडक; आई-मुलगा जखमी, चालक फरार**

मोशी (पुणे):

पुणे-नाशिक महामार्गाने जात असताना भरधाव पांढऱ्या रंगाच्या ट्रेलरने (ट्रक) ज्युपिटर मोपेडला उजव्या बाजूने जोरदार धडक दिली. या अपघातात आईच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून दुचाकी चालक मुलगाही जखमी झाला आहे. अपघातानंतर ट्रेलर चालक घटनास्थळी न थांबता पळून गेला.

फिर्यादी प्रकाश रामदास चांदोरे (वय ३८ वर्ष, रा. डुडुळगाव) हे ५७ वर्षीय आई नंदा चांदोरे यांच्यासह मोपेडने (चक १४ गथ ५४२६) जात असताना ओंकार ग्रुपजवळ हा अपघात घडला. एमआयडीसी भोसरी पोलिसांनी अज्ञात चालकावर गुन्हा नोंदवला असून पोलीस उपनिरीक्षक मगरे तपास करत आहेत. चाकण पोलीस ठाणे (एसटी बस अपघात)

**चाकण-तळेगाव चौकात एसटी बसचे ब्रेक फेल; खासगी बसला पाठीमागून धडक, चार प्रवासी जखमी**

चाकण (पुणे):

पुण्याहून नाशिककडे जाणाऱ्या एसटी बसचे ब्रेक अचानक न लागल्याने समोर उभ्या असलेल्या खासगी बसला जोरात पाठीमागून धडक दिल्याची घटना चाकण तळेगाव चौकाजवळ घडली. या अपघातात एसटी बसमधील चार प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत.

**अपघाताची माहिती:**

मंचर ते पुणे आणि पुणे ते नाशिक या मार्गावर धावणाऱ्या एसटी बसने (क्र. चक १३ उण ८४७३) चाकण येथून नाशिकसाठी प्रवासी भरले होते. एचपी पेट्रोल पंपाजवळ (आरती हॉटेलसमोर) पुढे असलेली खासगी बस पाहून एसटी चालकाने गाडी रस्त्याच्या डाव्या बाजूला घेऊन थांबवण्याचा प्रयत्न केला. मात्र, अचानक ब्रेक न लागल्याने एसटी बस थेट खासगी बसवर आदळली.

जखमी प्रवासी:

शुभांगी पोपट चव्हाण (वय ४३ वर्ष, रा. नारायणगाव)

नंदा बाळासाहेब शिंदे (वय ६३ वर्ष, रा. मंचर)

लक्ष्मण दगडू तलवारे (वय ५० वर्ष, रा. खेड)

महादेवी लक्ष्मण तलवारे (वय ४७ वर्ष, रा. खेड)

याप्रकरणी एसटी चालक सोपान भारत कानवडे याच्या निष्काळजी ड्रायव्हिंगविरोधात चाकण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. काळेवाडी पोलीस ठाणे (कौटुंबिक वादातून मारहाण)

**सुनेला माहेरी नेण्याच्या वादातून सासूवर चाकूने हल्ला; दोघींविरुद्ध काळेवाडी पोलिसांत गुन्हा दाखल**

पिंपरी-चिंचवड:

मुलीला माहेरी घेऊन जाण्याच्या कारणावरून सासूला मारहाण करत हातावर चाकूने वार केल्याची घटना नढेनगर, काळेवाडी येथे घडली आहे.

सविस्तर वृत्त:

फिर्यादी ५५ वर्षीय महिलेच्या घरी २० मे रोजी सकाळी ११ च्या सुमारास त्यांची सून आणि तिची आई कविता आबासाहेब देवकर (वय ५५ वर्ष, रा. देवगाव नाका, सोलापूर) या दोघी आल्या. सुनेला माहेरी घेऊन जाण्यावरून त्यांनी फिर्यादीशी वाद घातला. वादाचे रूपांतर भांडणात झाल्यानंतर आरोपींनी फिर्यादीला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यानंतर आरोपी महिलेच्या आईने (कविता देवकर) हातातील चाकूने फिर्यादीच्या उजव्या मनगटाजवळ वार करून गंभीर जखमी केले व "तुला साडी फेडून मारेन" अशी धमकी देऊन त्या सोलापूरला निघून गेल्या. याप्रकरणी पीडित महिलेच्या तक्रारीवरून काळेवाडी पोलिसांनी दोन्ही महिलांविरुद्ध गुन्हा नोंदवला असून पोलीस उपनिरीक्षक नलावडे अधिक तपास करत आहेत.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अ‍ॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### पिंपरी-चिंचवडच्या रस्त्यांवर खड्डे की मृत्यूचे सापळे? तापकीरनगरसह दहा भागांत नागरिकांचा संताप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी -: प्रतिनिधी**

पावसाळा सुरू होताच पिंपरी-चिंचवड शहरातील रस्त्यांची दुरवस्था पुन्हा एकदा नागरिकांच्या जीवावर बेतण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. काळेवाडी, रहाटणी, विजयनगर, तापकीरनगर, भारतमाता चौक, नढेनगर, कोकणेनगर, पाचपीर चौक, आदर्शनगर आणि ज्योतिबानगर परिसरातील रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडले असून पावसाचे पाणी त्यात साचल्याने वाहनचालकांना खड्ड्यांचा अंदाजही येत नाही.

या खड्ड्यांमुळे दुचाकीस्वार घसरून अपघात होण्याचे प्रमाण वाढण्याची भीती आहे. रात्रीच्या वेळी परिस्थिती आणखी धोकादायक बनते. रस्त्यावर पाणी साचलेले असल्याने नेमका खड्डा किती खोल आहे, याचा अंदाज वाहनचालकांना येत नाही. त्यामुळे रस्ता आहे की मृत्यूचा सापळा, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. या रस्त्यांवरून दररोज हजारो नागरिकांची ये-जा असते. वाहनचालकांबरोबरच पादचारी, विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांनाही मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

# कांद्याचे बाजारभाव वाढले; शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान

## प्रतिकिलो ३५ ते ५० रुपयांपर्यंत दर; कांदा चाळीत साठवणुकीसाठी शेतकऱ्यांची लगबग

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी । प्रतिनिधी**

गेल्या तीन वर्षांपासून कांद्याला अपेक्षित बाजारभाव मिळत नसल्याने उत्पादन खर्चही भरून निघत नव्हता. त्यामुळे कांदा उत्पादन घ्यायचे की नाही, अशा संभ्रमात असलेल्या शेतकऱ्यांना गेल्या पंधरा दिवसांपासून वाढत असलेल्या बाजारभावामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. सध्या कांद्याचे दर सरासरी प्रतिकिलो ३५ ते ५० रुपयांपर्यंत पोहोचल्याने शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसत आहे.

कांद्याला सातत्याने कमी दर मिळत असल्याने अनेक शेतकऱ्यांना तोटा सहन करावा लागत होता. बियाणे, खते, औषधे, मजुरी, पाणी आणि वाहतूक यांचा वाढलेला खर्च पाहता कांद्याला मिळणारा दर उत्पादन खर्चाच्या तुलनेत अपुरा ठरत होता.

परिणामी कांदा उत्पादनाबाबत शेतकऱ्यांमध्ये नाराजी



निर्माण झाली होती.

मात्र, गेल्या पंधरा दिवसांत कांद्याच्या बाजारभावात सातत्याने सुधारणा होत असल्याने परिस्थिती बदलली आहे. सध्या मिळत असलेल्या चांगल्या दरामुळे शेतकरी कांदा चाळीत साठवून ठेवण्याला प्राधान्य देत आहेत. कांदा चाळीत भरण्यासाठी मोठ्या प्रमाणात मजुरांची आवश्यकता असल्याने सध्या मजूर मिळणेही कठीण झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची कांदा साठवणुकीसाठी मोठी धावपळ सुरू आहे.

दरम्यान, आगामी काळात कांद्याच्या दरात आणखी वाढ होण्याची शक्यता असल्याचे लोणी येथील कांदा व्यापारी महेंद्र वाळूंज आणि नितीन नरवडे यांनी सांगितले. कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी बाजारभावातील चढ-उताराचा विचार करून एकाच वेळी संपूर्ण कांदा विक्रीस न आणता थोडा-थोडा कांदा बाजारात विकावा, असा सल्लाही त्यांनी दिला.

गेल्या काही वर्षांतील तोट्यामुळे निराश झालेल्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांना सध्याच्या वाढलेल्या बाजारभावामुळे काहीसा दिलासा मिळाला असून, दर आणखी वाढल्यास कांदा उत्पादकांना आर्थिक फायदा होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## ब्रिटिश धार्मिक नेत्याविरोधातील गुन्हा रद्द करा; आरपीआय आणि ख्रिश्चन आघाडीचे पोलीस आयुक्तांना निवेदन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे । प्रतिनिधी**

ब्रिटिश धार्मिक नेते पंकज देवनार यांच्याविरुद्ध दाखल करण्यात आलेला पोलीस गुन्हा रद्द करावा, तसेच संबंधित प्रकरणात कायद्याच्या तरतुदींचा अयोग्य वापर करण्यात आला असल्याने त्याची निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) आणि ख्रिश्चन आघाडीच्या प्रतिनिधींनी पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्याकडे केली.

यासंदर्भात आरपीआय (आठवले गट) आणि ख्रिश्चन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाने पोलीस आयुक्तांची भेट घेऊन निवेदन सादर केले. संबंधित व्यक्तीविरुद्ध दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यामुळे समाजात नाराजी निर्माण झाली असून, प्रकरणाची वस्तुस्थिती तपासून कायदेशीर बाबींचा योग्य विचार करावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

शिष्टमंडळात संजय सोनवणे, क्रिस्टोफर राजमणी, बाळासाहेब जानराव, महिपाल वाघमारे यांच्यासह विविध पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा समावेश होता.

निवेदनात संबंधित प्रकरणात कायद्याच्या तरतुदींचा गैरवापर झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे गुन्ह्याची कायदेशीर तपासणी करून तो मागे घ्यावा, अशी मागणी शिष्टमंडळाने केली. तसेच या प्रकरणात न्याय मिळाला नाही तर आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्यात येईल, असा इशाराही प्रतिनिधींनी दिला.

पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्याकडे निवेदन सादर करताना शिष्टमंडळाने प्रकरणाची सखोल चौकशी करून वस्तुस्थिती समोर आणण्याची मागणी केली. संबंधितांवर अन्याय होणार नाही आणि कायद्याचा समान व योग्य पद्धतीने वापर केला जाईल, याची दक्षता घेण्याचे आवाहनही करण्यात आले.

दरम्यान, या प्रकरणातील आरोप, गुन्ह्याच्या नेमक्या कलमा आणि पोलिसांची भूमिका याबाबत अधिकृत माहिती समोर आल्यानंतरच पुढील कायदेशीर बाब स्पष्ट होणार आहे.

## जारकरवाडी विविध कार्यकारी सोसायटीची ६७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात

### कर्जमाफीच्या धोरणावर सभासदांची नाराजी; सन २०२४-२५ साठी ११ टक्के लाभांशाची घोषणा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी : प्रतिनिधी**

जारकरवाडी (ता. आंबेगाव) येथील जारकरवाडी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी मर्यादितची ६७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे चेअरमन खंडुशेठ गेणभाऊ भोजने यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. सभेत संस्थेच्या वर्षभरातील कामकाजाचा आढावा घेण्यात आला. तसेच विविध विषयांवर सभासदांनी चर्चा करून आपल्या सूचना व प्रश्न मांडले.



संस्थेचे सचिव नवनाथ भिकन मंचरे यांनी वार्षिक अहवालाचे वाचन केले. यावेळी सभासदांनी विविध प्रश्न उपस्थित करून चर्चेत सक्रिय सहभाग घेतला. विशेषतः शेतकरी कर्जमाफीच्या मुद्द्यावर सभासदांमध्ये सविस्तर चर्चा झाली. नियमितपणे वेळेत कर्जाची परतफेड करणाऱ्या सभासदांना कर्जमाफीच्या लाभापासून वंचित राहावे लागत असल्याबद्दल काही सभासदांनी नाराजी व्यक्त केली. शासनाच्या कर्जमाफीच्या धोरणाबाबतही सभासदांमध्ये नाराजीचा सूर उमटला.

दरम्यान, संस्थेच्या सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या भागभांडवलावर सभासदांना ११ टक्के लाभांश देण्याची घोषणा चेअरमन खंडुशेठ गेणभाऊ भोजने यांनी केली. या घोषणेमुळे सभासदांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले. सभेस भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे संचालक रामचंद्र ढोबळे, माजी चेअरमन शिवाजीराव भोजने, माजी संचालक विलास लबडे, माजी उपसरपंच सचिन टाव्हरे, संस्थेचे उपाध्यक्ष बाळासाहेब लबडे, संतोष कापडी, काशिनाथ ढोबळे, सुभाष भोजने, ताराबाई काकडे, यमुनाबाई कापडी, योगिता लबडे यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते. सभा यशस्वीपणे पार पडल्याबद्दल संस्थेचे माजी उपाध्यक्ष गणेश खुडे यांनी उपस्थितांचे आभार मानले. त्यानंतर सभासदांनी सामूहिक भोजनाचा आस्वाद घेतला. अध्यक्षांच्या परवानगीने सभा समाप्त झाल्याचे जाहीर करण्यात आले.

# २३ ऑगस्ट : राष्ट्रीय अंतराळ दिवस भारताच्या अंतराळ भरारीचा गौरव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी,: प्रतिनिधी**

भारताच्या वैज्ञानिक प्रगतीच्या इतिहासात २३ ऑगस्ट हा दिवस अत्यंत महत्त्वाचा आहे. २३ ऑगस्ट २०२३ रोजी चांद्रयान-३ मोहिमेतील 'विक्रम' लँडरने चंद्राच्या पृष्ठभागावर यशस्वी सॉफ्ट लँडिंग केले आणि भारताने अंतराळ संशोधनाच्या क्षेत्रात ऐतिहासिक कामगिरी नोंदवली. या अभिमानास्पद यशाच्या स्मरणार्थ भारत सरकारने २३ ऑगस्ट हा दिवस 'राष्ट्रीय अंतराळ दिवस' म्हणून घोषित केला. भारतीय शास्त्रज्ञांची बुद्धिमत्ता, अथक परिश्रम आणि जिद्दीचा गौरव करणारा हा दिवस आहे.

चांद्रयान-३ मोहिमेने भारताच्या अंतराळ संशोधनाला नवी दिशा दिली. विक्रम लँडरच्या यशस्वी अवतरणानंतर प्रज्ञान रोव्हरने चंद्राच्या पृष्ठभागावर विविध वैज्ञानिक निरीक्षणे व माहिती संकलित केली. चंद्राच्या दक्षिण ध्रुवीय प्रदेशाजवळ यशस्वी सॉफ्ट लँडिंग करणारा भारत पहिला देश ठरला. या कामगिरीने संपूर्ण जगाचे लक्ष भारताकडे वेधले आणि प्रत्येक भारतीयाच्या मनात अभिमानाची भावना निर्माण केली.

मानवाला चंद्र, सूर्य, तारे आणि ग्रहांविषयी प्राचीन काळापासून कुतूहल आहे. आकाशातील रहस्ये समजून घेण्याच्या या जिज्ञासेतून खगोलशास्त्राचा विकास झाला. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीबरोबर मानवाने अंतराळात झेप घेतली. उपग्रह प्रक्षेपण, चंद्र आणि मंगळ मोहिमा तसेच अंतराळ स्थानकांच्या अभ्यासातून अंतराळ संशोधनाचा विस्तार होत गेला.

भारताच्या अंतराळ प्रवासात भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात इस्रोचे (खडठज) योगदान अत्यंत मोलाचे आहे. १९७५ मध्ये भारताचा पहिला उपग्रह 'आर्यभट्ट' प्रक्षेपित करण्यात आला. त्यानंतर दूरसंचार, हवामान, पृथ्वी निरीक्षण, नेव्हिगेशन आणि वैज्ञानिक संशोधनासाठी अनेक उपग्रह अवकाशात पाठविण्यात आले. चांद्रयान-१, चांद्रयान-२, चांद्रयान-३ आणि मंगळयान यांसारख्या मोहिमांनी भारताची वैज्ञानिक क्षमता जगासमोर सिद्ध केली.

अंतराळ तंत्रज्ञानाचा उपयोग केवळ चंद्र-ताऱ्यांचा अभ्यास करण्यापुरता मर्यादित नाही. शेतीमध्ये पिकांची स्थिती, जमिनीचा अभ्यास आणि जलस्रोतांचे निरीक्षण करण्यासाठी उपग्रहांची मदत होते. हवामानाचा अंदाज, चक्रीवादळांची पूर्वसूचना आणि नैसर्गिक आपत्तींचे व्यवस्थापन यामध्ये उपग्रह महत्त्वाची भूमिका बजावतात. दूरसंचार, दूरदर्शन, इंटरनेट, नेव्हिगेशन आणि नकाशे यांसारख्या सुविधांमध्येही अंतराळ तंत्रज्ञानाचे मोठे योगदान आहे. त्यामुळे अंतराळ संशोधन हे आधुनिक जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहे.

राष्ट्रीय अंतराळ दिवसाचा एक महत्त्वाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान, तंत्रज्ञान आणि संशोधनाविषयी कुतूहल व आवड निर्माण करणे हा आहे. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये विज्ञान प्रदर्शने, अंतराळ विषयक प्रकल्प, निबंध व वक्तृत्व स्पर्धा, प्रश्नमंजुषा, चित्रकला तसेच विविध शैक्षणिक उपक्रम आयोजित करून विद्यार्थ्यांना अंतराळ विज्ञानाच्या संधींची माहिती दिली जाते.

आजची विद्यार्थी पिढी ही उद्याच्या भारताची वैज्ञानिक शक्ती आहे. जिज्ञासा, कल्पकता, चिकित्सक विचार आणि प्रयोगशील वृत्ती जोपासल्यास अनेक विद्यार्थी भविष्यात अंतराळ शास्त्रज्ञ, अभियंते आणि संशोधक बनू शकतात. आकाशाकडे पाहताना केवळ चंद्र-तारे पाहण्याऐवजी त्यामागील विज्ञान समजून घेण्याची दृष्टी विद्यार्थ्यांनी विकसित करणे गरजेचे आहे. राष्ट्रीय अंतराळ दिवस हा केवळ चांद्रयान-३च्या ऐतिहासिक यशाचा उत्सव नाही, तर भारताच्या वैज्ञानिक स्वप्नांना नवी दिशा देणारा प्रेरणादायी दिवस आहे. चांद्रयान-३च्या यशातून जिद्द, मेहनत, शिस्त आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचे महत्त्व अधोरेखित होते. भारताने भविष्यात अंतराळ संशोधनाच्या क्षेत्रात आणखी मोठी भरारी घेत जगाच्या वैज्ञानिक प्रगतीत महत्त्वपूर्ण योगदान द्यावे, हीच राष्ट्रीय अंतराळ दिनानिमित्त अपेक्षा.

**माहिती संकलन : सौ. कमल संतोष थोरात**

पदवीधर शिक्षिका, जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा, थोरांदळे, ता. आंबेगाव, जि. पुणे

## महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे कामकाज होणार पेपरलेस; जिल्हा संघटकांना लॅपटॉपचे वाटप



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे । प्रतिनिधी**

बारामती: बदलत्या युगात नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार करून महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे कामकाज संपूर्णपणे पेपरलेस करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. या उद्देशाने असोसिएशनच्या जिल्हा संघटकांसह तांत्रिक समितीला नुकतेच लॅपटॉपचे वितरण करण्यात आले. या उपक्रमामुळे क्रीडा क्षेत्रातील प्रशासकीय कामकाजाला अधिक गती आणि पारदर्शकता मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

या संदर्भातील मुख्य ठळक मुद्दे खालीलप्रमाणे आहेत:लॅपटॉप वितरण: असोसिएशनच्या जिल्हा संघटकांना आणि तांत्रिक समितीला लॅपटॉपचे वाटप करण्यात आले.प्रमुख उपस्थिती: या कार्यक्रमाला असोसिएशनचे पदाधिकारी, क्रीडा संघटक आणि अर्जुन पुरस्कार विजेते मान्यवर उपस्थित होते. पेपरलेस कामकाज: नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून संपूर्ण प्रशासकीय प्रक्रिया डिजिटल आणि कागदविरहित करणे हा यामागील मुख्य उद्देश आहे.क्रीडा स्पर्धा: कै. भाई नेरुरकर चषक राज्यस्तरीय खो-खो स्पर्धा ऑक्टोबर महिन्यात बारामती येथे आयोजित केली जाणार असल्याचेही यावेळी जाहीर करण्यात आले.

## शिक्षणाने व्यक्तीला केवळ साक्षर न करता जगण्याचा व्यापक दृष्टिकोन दिला पाहिजे; उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे प्रतिपादन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे । प्रतिनिधी**

''शिक्षण म्हणजे केवळ पदवी मिळवण्याची प्रक्रिया नसून व्यक्तिमत्त्वाला आकार देऊन अस्तित्वाला अर्थ देणारी प्रक्रिया आहे, '' असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी केले. पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या वतीने बालगंधर्व रंगमंदिर येथे आयोजित विशेष नैपुण्य प्राप्त शिक्षक आणि गुणवंत विद्यार्थ्यांच्या गौरव सोहळ्यात त्या बोलत होत्या.या कार्यक्रमाचे मुख्य बातमीदार मुद्दे खालीलप्रमाणे:गुणवंतांचा बहुमान: बालगंधर्व रंगमंदिर येथे आयोजित विशेष सोहळ्यात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शिक्षकांचा आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.मूल्यसंस्कारांची गरज: विद्यार्थ्यांनी ज्ञानासोबतच जिज्ञासा, चिकाटी, शिस्त, संवेदनशीलता, प्रामाणिकपणा आणि कृतज्ञता हे गुण अंगीकारून संस्था, शिक्षक व पालकांप्रती सदैव कृतज्ञ राहावे, असे आवाहन उपमुख्यमंत्र्यांनी केले.एकत्रित प्रयत्नांवर भर: विद्यार्थ्यांच्या प्रत्येक



यशामागे त्यांची स्वतःची जिद्द, पालकांचा त्याग आणि शिक्षकांची दूरदृष्टी असते. त्यामुळे त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षक, पालक आणि शैक्षणिक संस्थांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.मान्यवरांची उपस्थिती: या सोहळ्याला पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष दिगंबर दुर्गाडे, शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष राजेंद्र घाडगे, खजिनदार मोहनराव देशमुख, उपसचिव एल. एम. पवार, सहसचिव ए. एम. जाधव, मानद सचिव संदीप कदम, महिला प्रदेशाध्यक्ष वैशाली नागवडे यांच्यासह सेवक सहकारी पतसंस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## चाकण औद्योगिक परिसरातील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी 'एआय' आधारित कृती आराखडा तयार करा; जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांचे निर्देश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चाकण । प्रतिनिधी**

चाकण औद्योगिक परिसरातील तीव्र वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी वाहतूक नियोजन, वाहनतळांची उपलब्धता, अतिक्रमण निर्मूलन आणि रस्ते सुधारणा यांचा एकत्रित विचार करून तात्काळ कृती आराखडा तयार करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले आहेत. चाकण एमआयडीसी परिसरातील रस्ते आणि पायाभूत सुविधांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते.या बैठकीतील मुख्य बातमीदार मुद्दे खालीलप्रमाणे:कृत्रिम बुद्धिमत्तेचा (अख) वापर: चाकण परिसरातील वाहतूक व्यवस्था, वाहनांची संख्या, पार्किंगची गरज आणि संभाव्य वाहतूक कोंडीच्या ठिकाणांचा अभ्यास करण्यासाठी एआय (अख) आधारित विश्लेषण व सिम्युलेशन करण्यात येणार आहे.कृती आराखड्याची मुदत: रस्ते सुधारणा आणि वाहतूक उपाययोजनांचा हा आराखडा पुढील शुक्रवारपर्यंत तयार करण्याचा प्रयत्न करावा, तसेच सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात या आराखड्यास मंजुरी मिळवून पुढील ३ ते ४ महिन्यांत आवश्यक कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.अतिक्रमण निर्मूलन: चाकण औद्योगिक परिसरातील वाहतुकीला अडथळा ठरत असलेली अतिक्रमणे हटविण्याच्या कारवाईला गती देण्याचे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत.मान्यवरांची उपस्थिती: या आढावा बैठकीस आमदार बाबाजी काळे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांच्यासह विविध शासकीय यंत्रणांचे प्रमुख अधिकारी, सल्लागार आणि औद्योगिक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## सारांश वृत्त

### यमुना उद्ध्वस्त झाली, पण दोष कोणाचा? सर्वोच्च न्यायालयाने 'आर्ट ऑफ लिव्हिंग'वरील ५ कोटींची जबाबदारी हटवली; मात्र दिल्ली विकास प्राधिकरणाला सुनावले

र्ती एन. के. सिंह यांच्या खंडपीठाने व्यक्ती विकास केंद्राची याचिका मंजूर केली. हा वाद ११ ते १३ मार्च २०१६ या कालावधीत झालेल्या भव्य सांस्कृतिक महोत्सवामुळे निर्माण झाला होता. यमुनेच्या सुमारे २५ हेक्टर सक्रिय पूरमैदानावर हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आणि जगभरातून तब्बल ३५ लाख लोक या कार्यक्रमासाठी आले होते. कार्यक्रमासाठी पूरमैदानावर मोठ्या प्रमाणात बांधकाम करण्यात आले होते.

या कार्यक्रमावर पर्यावरणवादी मनोज मिश्रा, प्रमोद त्यागी आणि आनंद आर्य यांनी राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणात धाव घेतली होती. न्यायाधिकरणाने २०१६ मध्ये पर्यावरणीय भरपाई म्हणून ५ कोटी रुपये जमा करण्याचे निर्देश दिले. त्यानंतर डिसेंबर २०१७ मध्ये न्यायाधिकरणाने आर्ट ऑफ लिव्हिंगला पूरमैदानाच्या नुकसानीसाठी जबाबदार धरले आणि जमा केलेली रक्कम पुनर्वसनासाठी वापरण्याचे निर्देश दिले.

मात्र सर्वोच्च न्यायालयाने या निष्कर्षावरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले. कार्यक्रमामुळेच पर्यावरणाचे नुकसान झाले, हे सिद्ध करणारा थेट पुरावा नसल्याचे न्यायालयाने नमूद केले. उलट, कार्यक्रम होण्यापूर्वीच संबंधित जागेची अवस्था खराब असल्याचे दाखवणारे पुरावे न्यायालयासमोर असल्याचे स्पष्ट झाले. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने काही महत्त्वाच्या पुराव्यांचा योग्य विचार केला नाही आणि तज्ज्ञ समितीच्या निष्कर्षांवर अवलंबून राहताना कार्यक्रमामुळे झालेले नुकसान आणि आधीपासून अस्तित्वात असलेली हानी यामधील फरक पुरेशा प्रमाणात तपासला नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले.

पण या निर्णयात आर्ट ऑफ लिव्हिंगला दिलासा मिळाला म्हणून दिल्ली विकास प्राधिकरणाची जबाबदारी संपलेली नाही.

# साखरेचा किलो ३५ रुपयांनी महाग; रेशनवरची साखर बंदच! 'गोडवा' महाग, गरीबांच्या ताटात कडवटपणा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे : विशेष प्रतिनिधी**

दैनंदिन जीवनातील चहापासून सणासुदीच्या गोडधोडापर्यंत प्रत्येक घरासाठी आवश्यक असलेली साखर आता सर्वसामान्यांच्या बजेटची परीक्षा घेऊ लागली आहे. गेल्या दोन महिन्यांत खुल्या बाजारात साखरेच्या दरात किलोमागे तब्बल ३५ रुपयांहून अधिक वाढ झाल्याचा दावा केला जात आहे. त्यामुळे आधीच महागाईच्या कचाट्यात सापडलेल्या मध्यमवर्गीय आणि कष्टकरी कुटुंबांचे आर्थिक गणित कोलमडले आहे.

एकीकडे खाद्यपदार्थांसह जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमतींनी सामान्य नागरिक त्रस्त असताना, दुसरीकडे गरीब कुटुंबांसाठी आधार ठरणाऱ्या रेशन व्यवस्थेत साखर उपलब्ध नसल्याने संताप वाढत आहे. खुल्या बाजारात दर वाढले असताना रेशनवर स्वस्त साखर उपलब्ध नसेल, तर सर्वाधिक फटका नेमका गरीबांनाच बसणार, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

महागाईच्या भडक्यात घरगुती बजेट उद्ध्वस्त

साखर ही चैनीची वस्तू नाही. चहा, नाश्ता, घरगुती पदार्थ आणि सणासुदीच्या गोडधोडासाठी तिचा नियमित वापर होतो. त्यामुळे साखरेच्या दरातील मोठी वाढ थेट घरगुती खर्चावर परिणाम करते.

मध्यमवर्गीय कुटुंबांकडे काही प्रमाणात खर्चाचे नियोजन बदलण्याची क्षमता असली तरी कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांसाठी प्रत्येक रुपयाचा हिशेब महत्त्वाचा असतो. अशा परिस्थितीत साखरेसारख्या मूलभूत वस्तूच्या किमतीत मोठी वाढ म्हणजे घरच्या बजेटमधून दुसऱ्या गरजेच्या वस्तूवर कात्री चालविण्याची वेळ.

नोकरदारांना महागाई भत्ता; रोजंदारी कामगारांचे काय?

महागाई वाढली की सरकारी कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता आणि अनेक नोकरदारांना वेतनवाढीच्या माध्यमातून काही प्रमाणात संरक्षण मिळते. मात्र, रोजंदारीवर काम करणाऱ्या शेतमजुरांना, बांधकाम कामगारांना, फेरीवाल्यांना आणि असंघटित क्षेत्रातील लाखो कामगारांना असा नियमित महागाई भत्ता मिळत नाही.

उत्पन्न वाढत नाही, पण बाजारभाव वाढत राहतातमग या कुटुंबांनी जगायचे कसे?

दोन वेळचे जेवण, मुलांचे शिक्षण, घरभाडे, वीजबिल आणि आरोग्याचा खर्च सांभाळतानाच आता रोजच्या चहासाठीही अधिक पैसे मोजावे लागत असतील, तर महागाईचा खरा भार कोण वाहत आहे, याचा सरकारने विचार करणे गरजेचे आहे.

रेशनवरची साखर बंद; खुल्या बाजाराचा आधार घेण्याची सक्ती

पूर्वी सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत पात्र लाभार्थींना सवलतीच्या दरात साखर उपलब्ध करून दिली जात होती. मात्र, रेशनवरील साखरेचे वितरण बंद झाल्याने गरीब कुटुंबांना खुल्या बाजारावर अवलंबून राहावे लागत आहे.

खुल्या बाजारात दर कमी असताना रेशनवरील साखरेची गरज नाही, असा युक्तिवाद केला गेला असेल; परंतु आज बाजारभाव वाढले असताना गरीबांना स्वस्त पर्याय उपलब्ध करून देण्याची जबाबदारी सरकारची नाही का?

रेशन व्यवस्था ही केवळ धान्य वितरणाची यंत्रणा नसून आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी सामाजिक सुरक्षेचे महत्त्वाचे साधन आहे. त्यामुळे महागाईच्या काळात या व्यवस्थेचा पुनर्विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे.

सणांच्या तोंडावर 'गोडवा' परवडणार कसा?

गणेशोत्सव आणि त्यानंतर दिवाळीचे सण जवळ येत आहेत. भारतीय कुटुंबांमध्ये सण म्हणजे गोडधोड, पाहुणचार आणि परंपरा. मात्र, जीवनावश्यक वस्तूंचे दर असेच वाढत राहिले तर सण साजरा करण्याचा आनंदही आर्थिक गणितात अडकण्याची शक्यता आहे.

सरकारने साखरेच्या दरवाढीमागील कारणांचा तातडीने आढावा घ्यावा. साठेबाजी किंवा कृत्रिम टंचाई असल्यास कठोर कारवाई करावी. व्यापाऱ्यांच्या साठ्याची तपासणी आणि आवश्यक असल्यास साठा मर्यादा लागू करण्याबाबत निर्णय घ्यावा.

## भारत सर्वसमावेशक संस्कृतीची बेरीज : डॉ. श्रीपाल सबनीस

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोल्हापूर । प्रतिनिधी**

''भारत हा कोणत्याही एका महामानवाचा, धर्माचा किंवा विचारपरंपरेचा नसून सर्व महामानवांच्या मानवतावादी सामर्थ्याची बेरीज म्हणजे भारत आहे, '' असे प्रतिपादन ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष आणि ज्येष्ठ विचारवंत डॉ. श्रीपाल सबनीस यांनी येथे केले. पिंपरी, पुणे येथील 'लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठान'तर्फे शाहू स्मारक भवनात आयोजित पुरस्कार वितरण समारंभात ते अध्यक्षीय मनोगत व्यक्त करत होते. ''भारतीय संस्कृतीची निर्मिती केवळ एका जातीत किंवा धर्मात झालेली नसून, सर्व जाती-धर्म, आदिवासी समाज, बहुजनांचे श्रम आणि सामान्य माणसाच्या योगदानातून ती घडली आहे, '' असेही त्यांनी पुढे नमूद केले. दिग्गजांचा बहुमानया सोहळ्यात विविध क्षेत्रातील मान्यवरांना प्रतिष्ठानतर्फे सन्मानित करण्यात आले:जीवन गौरव पुरस्कार: शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांना 'लोकशिक्षक बाबा भारती जीवन गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला.शिक्षक प्रतिभा पुरस्कार: ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ डॉ. एन. डी. जत्राटकर आणि ज्येष्ठ पत्रकार-लेखक डॉ. संजय थोरात यांना 'लोकशिक्षक बाबा भारती शिक्षक प्रतिभा पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले.समन्वयाचे प्रतीक: बाबा भारतीबाबा भारती यांच्या कार्याचा गौरव करताना डॉ. सबनीस म्हणाले की, बाबा भारती हे समन्वय, समता आणि संवादाचे प्रतीक होते. बौद्ध विचारांशी निष्ठावान असतानाही त्यांनी स्वतःला एका धर्माच्या चौकटीत अडकवून घेतले नाही. त्यांनी बुद्ध धम्म, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मार्क्सवाद आणि गांधीवादी विचारांसह विविध ज्ञानपरंपरांचा चिकित्सक अभ्यास करून मानवकल्याणकारी मूल्यांचा समन्वय साधला. प्रतिष्ठानने त्यांच्याच समन्वयवादी भूमिकेला पुढे नेत विविध क्षेत्रांतील मानवतावादी व्यक्तींचा गौरव केला ही अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले.

## जयपूरमध्ये 'कॉकरोच जनता पार्टी'च्या पथकावर हल्ला की गावकऱ्यांवर दबाव?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

राजस्था नातील सरकारी शाळांची अवस्था पाहण्यासाठी गेलेल्या कॉकरोच जनता पार्टीच्या पथकावर जयपूरजवळील बगरू गावात झालेल्या कथित हल्ल्याने आता वेगळेच वळण घेतले आहे. या घटनेप्रकरणी कॉकरोच जनता पार्टी आणि स्थानिक गावकऱ्यांनी एकमेकांविरोधात पोलिसांत गुन्हे दाखल केल्याने नेमका दोषी कोण, हा प्रश्न अधिकच गुंतागुंतीचा झाला आहे.

२१ ऑगस्ट रोजी कॉकरोच जनता पार्टीचे कार्यकर्ते त्यांच्या 'शाळा ठीक करा' मोहिमेअंतर्गत सरकारी शाळेला भेट देण्यासाठी गावात गेले होते. त्यावेळी स्थानिक नागरिकांनी त्यांना विरोध केला आणि त्यातून वाद निर्माण झाल्याचे समोर आले आहे. कॉकरोच जनता पार्टीच्या सदस्यांवर हल्ला झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. मात्र, गावकऱ्यांनीही पोलिसांत तक्रार दाखल करत कॉकरोच जनता पार्टीचे सदस्य मोठ्या संख्येने गावात आले, त्यांनी नागरिकांना धाक दाखवला आणि परिसरात गोंधळ निर्माण केला, असा आरोप केला आहे.

शवदासपुरा पोलीस ठाण्याचे प्रभारी राजेश गौतम यांनी गावकऱ्यांकडून तक्रार दाखल झाल्याची माहिती दिली आहे. म्हणजेच आता या प्रकरणात एकाच बाजूची कथा अधिकृत सत्य मानता येणार नाही. दोन्ही बाजूंचे आरोप पोलिसांच्या तपासाच्या कसोटीवर उतरावे लागतील.

पण या घटनेचा खरा प्रश्न केवळ गुन्हे दाखल करण्यापुरता मर्यादित नाही. सरकारी शाळेची पाहणी करण्यासाठी जाणाऱ्या पथकाला गावात विरोध का झाला? शाळेची अवस्था दाखवणे हा इतका मोठा गुन्हा आहे का? आणि जर कॉकरोच जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी खरंच गावकऱ्यांना धमकावले असेल, तर त्याचीही तितक्याच कठोरपणे चौकशी होणार का?

शाळांची अवस्था सुधारण्याऐवजी शाळेची अवस्था दाखवणाऱ्यांवरच संघर्ष उभा राहत असेल, तर प्रश्न केवळ कॉकरोच जनता पार्टीचा नाहीतो राजस्थानच्या शिक्षणव्यवस्थेच्या पारदर्शकतेचा आहे. सरकारी शाळा सार्वजनिक पैशातून चालतात. त्यामुळे त्यांची स्थिती विचारणे हा नागरिकांचा अधिकार आहे. मात्र, हा अधिकार वापरताना कायदा आणि स्थानिक नागरिकांचा सन्मान राखणेही तितकेच आवश्यक आहे.

# न्यायव्यवस्थेच्या प्रवेशद्वारावर मोठा बदल; तीन वर्षांचा अनुभव आता फक्त एक वर्ष!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई : विशेष प्रतिनिधी**

नवी दिल्ली : लहान मुलांना सर्दी, नाक बंद होणे किंवा अशा लक्षणांसाठी दिल्या जाणाऱ्या काही औषधांच्या वापराबाबत केंद्र सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने क्लोरफेनिरामाइन मॅलेट आणि फेनिलेफ्रिन हायड्रोक्लोराइड ही दोन औषधी घटक असलेल्या सर्व निश्चित-मात्रा संयुक्त औषधांच्या निर्मिती, विक्री आणि वितरणावर निर्बंध लागू केले आहेत. विशेष म्हणजे, चार वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांसाठी ही औषधे वापरू नयेत, असा स्पष्ट इशारा औषधांवर देणे आता बंधनकारक करण्यात आले आहे.

सरकारने गेल्या वर्षी या दोन्ही घटकांचा समावेश असलेल्या काही संयुक्त औषधांवर याच प्रकारचे वयोमर्यादेचे निर्बंध लागू केले होते. मात्र, आता या निर्णयाची व्याप्ती वाढवून या दोन्ही घटकांचा समावेश असलेल्या सर्व औषधांना हा नियम लागू करण्यात आल आहे.

प्रश्न असा आहे की, चार वर्षांखालील मुलांसाठी या औषधांवर इतका स्पष्ट इशारा देण्याची वेळ का आली? लहान मुलांच्या शरीरावर औषधांचा परिणाम प्रौढांपेक्षा वेगळा असू शकतो. त्यामुळे पालकांनी डॉक्टरांचा सल्ला न घेता सर्दी-खोकल्याची औषधे देणे कितपत सुरक्षित आहे, हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

सरकारचा हा निर्णय केवळ औषध कंपन्यांसाठी नियम कडक करणारा नाही, तर पालकांसाठीही गंभीर इशारा आहे. औषधांच्या आकर्षक जाहिराती, घरात उपलब्ध असलेली औषधे किंवा पूर्वी वापरलेली मात्रा पाहून लहान मुलांना औषध देणे धोकादायक ठरू शकते.

मात्र, नियम कागदावर आणून प्रश्न सुटत नाही. बाजारात विकली जाणारी औषधे, त्यावरील इशारे आणि औषधविक्रेत्यांकडून होणारी विक्री यावर प्रत्यक्ष नियंत्रण किती प्रभावी आहे? हा खरा प्रश्न आहे.

लहान मुलांच्या आरोग्याच्या बाबतीत निष्काळजीपणाला जागा नसावी. सरकारने निर्बंध जाहीर केले आहेत; आता त्यांची कठोर अंमलबजावणी होते का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## 'स्कूल ठीक करो' की सरकारला आरसा दाखवल्याची शिक्षा? दिपकेंवरील गुन्ह्यामागे सत्तेचा दबाव आहे का?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई । प्रतिनिधी**

लातूर : प्रतिनिधी

औसा येथील जिल्हा परिषद उर्दू शाळेत कथित अनधिकृत प्रवेश, चित्रीकरण आणि शिक्षकांच्या कामात अडथळा आणल्याच्या आरोपावरून 'कॉकरोच जनता पार्टी'चे प्रमुख अभिजीत दिपके यांच्यासह सहा जणांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांत दाखल झालेल्या तक्रारीतील आरोप गंभीर आहेत; मात्र या कारवाईमुळे एक मूलभूत प्रश्नही समोर आला आहे'स्कूल ठीक करो' अभियानातून सरकारी शाळांमधील कथित अनियमितता समोर आणणाऱ्यांविरोधातच गुन्हे दाखल होत असतील, तर यामागे राजकीय दबाव आहे का?

या प्रकरणात तक्रारदाराने केलेले आरोप हे तपासाचा विषय आहेत. दिपके दोषी आहेत की नाहीत, हे न्यायालयीन प्रक्रियेतच निश्चित होणार आहे. त्यामुळे गुन्हा दाखल झाला म्हणजे आरोप सिद्ध झाले, असा निष्कर्ष काढणे घाईचे ठरेल. मात्र, तक्रारीची वेळ, अभियानाची राजकीय पार्श्वभूमी आणि दिपकेंनी उपस्थित केलेले प्रश्न यामुळे सत्ताधाऱ्यांच्या भूमिकेबाबत संशय निर्माण होणे स्वाभाविक आहे.

दिपके यांनी औसा येथील शाळेच्या पाहणीदरम्यान खासगी शाळेचे विद्यार्थी जिल्हा परिषद शाळेच्या आवारात आढळल्याचा दावा केला होता. हा दावा खरा असेल तर त्याची चौकशी होणे आवश्यक आहे. खासगी शाळेतील विद्यार्थी सरकारी शाळेत कोणाच्या परवानगीने आले? त्यांना शाळेच्या परिसरात प्रवेश कसा मिळाला? प्रशासनाला याची माहिती होती का? आणि या संपूर्ण प्रकरणाची जबाबदारी कोणाची? या प्रश्नांची उत्तरे शोधण्याऐवजी प्रश्न विचारणाऱ्यावरच गुन्हा दाखल झाला, तर त्यातून चुकीचा संदेश जाण्याची शक्यता आहे. दुसरीकडे, शाळेत विनापरवानगी प्रवेश केला असेल, विद्यार्थ्यांचे चित्रीकरण केले असेल किंवा शिक्षकांना धमकावले असेल, तर कायदा आपले काम करेलच. शाळा ही विद्यार्थ्यांची सुरक्षित जागा आहे. कोणालाही अभियानाच्या नावाखाली नियम मोडण्याचा अधिकार नाही. परंतु नियमभंगाचा तपास करताना मूळ मुद्दासरकारी शाळांच्या कारभारातील कथित त्रुटीदाबला जाऊ नये, एवढीच अपेक्षा आहे. या प्रकरणात सर्वात गंभीर प्रश्न राजकीय पारदर्शकतेचा आहे. राज्यात भाजपच्या नेतृत्वाखाली सरकार सत्तेवर असताना सरकारच्या धोरणांवर किंवा प्रशासनाच्या कामकाजावर प्रश्न उपस्थित करणाऱ्या व्यक्तींविरोधात पोलिसांत तक्रारी दाखल झाल्या की, त्या कारवाईकडे केवळ कायदेशीर घटना म्हणून पाहता येत नाही. तक्रारदारावर कोणताही राजकीय दबाव नाही, हे सरकारने स्पष्ट करणे गरजेचे आहे.

## द्वारिका धाम सोसायटीच्या स्वयंघोषित कमिटीच्या कारभाराची अधिकृत चौकशीचे

■ **पुणे : प्रतिनिधी**

टिळेकर नगर कोंढवा द्वारिका धाम टॉवर टी -५ सोसायटीतील सध्याच्या स्वयंघोषित चेअरमन, सेक्रेटरी व इतर संबंधित पदाधिकाऱ्यांच्या कारभाराबाबत सभासदांकडून करण्यात आलेल्या विविध तक्रारींची उपनिबंधक कार्यालयाने गंभीर दखल घेतली असून तक्रारदारांकडून सादर करण्यात आलेली कागदपत्रे व उपलब्ध पुरावे तपासल्यानंतर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ८९ अन्वये सोसायटीच्या कामकाजाची अधिकृत तपासणी व चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले.

त्यामुळे सध्याच्या स्वयंघोषित कमिटीच्या स्थापनेपासून आतापर्यंतच्या कारभारातील विविध बाबी अधिकृत तपासणीच्या कक्षेत येणार असून, सोसायटीचा कारभार नियमांनुसार झाला की नियमबाह्य पद्धतीने, याची वस्तुस्थिती चौकशीतून स्पष्ट होणार आहे. तसेच व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपवरील संदेशांबाबतही सभासदांनी आरोप केले. सोसायटीच्या व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपवर काही सभासदांविषयी बदनामीकारक व दिशाभूल करणारे संदेश प्रसारित करून, स्वतःची बाजू योग्य असल्याचे दाखवण्याचा आणि इतर सभासदांची सहानुभूती मिळवण्याचा प्रकार अनेक वेळा झाल्याचा आरोपही करण्यात आला. विशिष्ट सभासदाला लक्ष्य करून त्याच्याविरोधात संदेश प्रसारित करणे, त्यातून इतर सभासदांची दिशाभूल करणे आणि स्वतःची बाजू खरी असल्याचे चित्र निर्माण करण्याचा प्रयत्न झाल्याचेही काही सभासदांचे म्हणणे आहे. या संदर्भात यापूर्वी पोलीस ठाण्यात तक्रारी तसेच गुन्हे दाखल झाल्याचा दावाही संबंधितांकडून करण्यात आला आहे. या आरोपांची सत्यता आणि संबंधित प्रकरणांची वास्तविक स्थिती ही अधिकृत नोंदी व चौकशीतूनच स्पष्ट होणार आहे. उपनिबंधक कार्यालयाच्या आदेशामुळे सोसायटीच्या कारभाराबाबत सुरू असलेल्या वादाला अधिकृत चौकशीची दिशा मिळाली असून कायदेशीर तसेच नियमबाह्य याचा अंतिम खुलासा कागदपत्रे व अधिकृत चौकशीतूनच होणार आहे.

# बांगलादेशच्या पंतप्रधानांच्या भारत दौऱ्याची तयारी झाली की फक्त 'सराव'? राष्ट्रपती भवनाचा ई-मेल मागे; दौऱ्याबाबत संभ्रम कायम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

बांगलादेशचे पंतप्रधान तारिक रहमान यांच्या भारत दौऱ्याबाबत गेल्या काही काळापासून सुरू असलेल्या चर्चेला शुक्रवारी अचानक वेगळेच वळण मिळाले. राष्ट्रपती भवनाकडून प्रसारमाध्यमांना पाठवण्यात आलेल्या एका ई-मेलमुळे रहमान यांचा भारत दौरा लवकरच होणार असल्याचे संकेत मिळाले. मात्र, काही वेळातच हा ई-मेल मागे घेण्यात आल्याने आता प्रश्न उपस्थित होत आहेतदौऱ्याची अधिकृत तयारी सुरू होती की राष्ट्रपती भवनाकडून चुकून संवेदनशील माहिती बाहेर पडली?

२१ ऑगस्ट रोजी दुपारी राष्ट्रपती भवनाकडून प्रसारमाध्यमांना पाठवण्यात आलेल्या ई-मेलमध्ये शनिवारी, २२ ऑगस्ट रोजी राष्ट्रपती भवनाच्या प्रांगणात होणारा 'गार्ड बदल समारंभ' होणार नसल्याचे सांगण्यात आले. यामागचे कारण म्हणून बांगलादेशच्या पंतप्रधानांच्या औपचारिक स्वागतासाठी होणाऱ्या पूर्ण सरावाचा उल्लेख करण्यात आला होता.

राष्ट्रपतींच्या उपप्रेस सचिव नविका गुप्ता यांच्या नावाने पाठवण्यात आलेल्या या संदेशाने साहजिकच खळबळ उडाली. कारण एखाद्या परदेशी पंतप्रधानांच्या औपचारिक स्वागताचा पूर्ण सराव होतोय, याचा सरळ अर्थ संबंधित दौऱ्याची तयारी अंतिम टप्प्यात असल्याचा घेतला जाऊ शकतो.



पण त्यानंतर हा संदेश मागे घेण्यात आला. त्यामुळे संभ्रम आणखी वाढला आहे. जर दौरा निश्चित नव्हता, तर औपचारिक स्वागताच्या पूर्ण सरावाचा उल्लेख असलेला संदेश प्रसारमाध्यमांना गेला कसा? आणि जर दौरा निश्चित होता, तर ई-मेल मागे घेण्याची गरज का पडली?

विशेष म्हणजे, तारिक रहमान यांच्या भारत दौऱ्याबाबत आधीपासूनच चर्चा सुरू आहे. त्यामुळे राष्ट्रपती भवनासारख्या अत्यंत संवेदनशील संस्थेकडून आलेला संदेश केवळ सामान्य प्रशासकीय चूक म्हणून दुर्लक्षित करता येणार नाही.

परराष्ट्र धोरणात प्रत्येक शब्दाला अर्थ असतो आणि राष्ट्रपती भवनाचा प्रत्येक संदेश अधिक गांभीर्याने घेतला जातो. त्यामुळे आता सरकारने स्पष्ट करणे आवश्यक आहे की भारत-बांगलादेश संबंधांमध्ये प्रत्यक्षात काय सुरू आहे आणि रहमान यांच्या भारत दौऱ्याचे नेमके वेळापत्रक काय आहे?

ई-मेल मागे घेता येतो; पण त्यातून निर्माण झालेला प्रश्न मात्र मागे घेता येणार नाही.